उमेद
क्षितिज नवे, विश्वास नवा...

# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान


जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बीड,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय, चिंतलांगे बिल्डींग, हिरो शोरुमच्या वर, नगर रोड,बीड-431122
दुरध्वनी क्र. 02442-226677 ईमेल- dmmubeed@gmail.com


जा.क.एमएसआरएलएम/बीड/ 510 /2017 दि. 26/ 12 /2017

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बीड मार्फत Intensive तालुक्यात स्वंयसहायता समूहाची स्थापना, सक्षमीकरण, बळकटीकरण, संगोपन , क्षमता बांधणी इत्यादी कामे करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने 11 महिण्याच्या कालावधी करिता जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील प्रभाग समन्वयक व सहायक कर्मचाऱ्याची खालील रिक्त असलेली पदे भरण्याकरिता अर्ज www.msrlmbeed.govbharti.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत असून ऑनलाईन पध्दतीने दि. 27 / 12 / 2017 ते दि. 10 / 01 / 2018 पर्यत अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | पदाचे नांव व मानधन | आरक्षणनिहाय रिक्त पदे | | रकाना 3 पैकी समांतर आरक्षण | शैक्षणिक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | | 4 | 5 | 6 |
| 1 | प्रभाग समन्वयक (मानधन - 20500/-) | अजा | 2 | महिला-1 | 1. पदवी परिक्षा उत्तीर्ण<br>2.BSW किंवा Bsc Agriculture किंवा MSW किंवा MBA किंवा PG in Rural Development किंवा PG in Rural Management या पैकी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य राहील.<br>3.संगणक व लॅपटॉप हाताळणीचे ज्ञान असणे आवश्यक | पदवी परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतरचा जोखीम प्रवण गट ( माहिला, अंपग, SC/ST सह) सामाजिक प्रवर्तन व संस्थीय बांधणी विषयक कामाचा कमीत कमी 3 वर्षाचा ग्रामीण विकास, सामाजिक प्रवर्तन, गरिबी निमुर्लन, उपजिविका विकास कार्यक्रमाचा अनुभव आवश्यक |
| | | अज | 4 | महिला-1 | | |
| | | विजअ | 2 | महिला-1 | | |
| | | भजब | 2 | महिला-1 | | |
| | | भजक | 2 | महिला-1 | | |
| | | भजड | 1 | ----- | | |
| | | विमाप्र | 1 | ----- | | |
| | | इमाव | 7 | महिला-2 अंपग-1 | | |
| | | खुला | 22 | महिला-8 अंपग-1 | | |
| | | एकूण | 43 | महिला-15, अंपग-2 | | |
| 2 | प्रशासन सहाय्यक (मानधन रु 15000/-) | खुला | 1 | ----- | 1)कोणत्याही शाखेतील पदवी<br>2) इंग्रजी टायपिंग वेग 40 WPM आणि<br>3) मराठी टायपिंग वेग 30 WPM परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>4) MS-CIT किंवा समकक्ष | किमान 3 वर्ष प्रशासकीय कामाचा अनुभव आवश्यक |
| | | एकूण | 1 | ----- | | |
| 3 | प्रशासन/लेखा सहायक ( मानधन रु 15000/-) | अजा | 1 | ----- | 1)वाणिज्य शाखेतील पदवी<br>2) इंग्रजी टायपिंग वेग 40 WPM आणि<br>3) मराठी टायपिंग वेग 30 WPM परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>4 MS-CIT किंवा समकक्ष | किमान 3 वर्ष प्रशासकीय कामाचा अनुभव आवश्यक |
| | | अज | 1 | ----- | | |
| | | विजअ | 1 | ----- | | |
| | | इमाव | 2 | महिला-1 | | |
| | | खुला | 5 | महिला-1 | | |
| | | एकूण | 10 | महिला-2 | | |
| 4 | डाटा एन्ट्री ऑपरेटर ( मानधन रु 10000/-) | अज | 1 | ----- | 1) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण ( इयत्ता 12 वी )<br>2) इंग्रजी टायपिंग वेग 40 WPM आणि<br>3) मराठी टायपिंग वेग 30 WPM परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>4) MS-CIT किंवा समकक्ष | किमान 3 वर्ष डाटा एन्ट्री ऑपरेटर (संगणक परिचालक) कामाचा अनुभव आवश्यक |
| | | विजअ | 1 | ----- | | |
| | | इमाव | 2 | महिला-1 | | |
| | | खुला | 2 | महिला-1 | | |
| | | एकूण | 6 | महिला-2 | | |
| 5 | शिपाई ( मानधन रु 8000/-) | अज | 1 | ----- | 10 वी ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | किमान 3 वर्ष शासकीय कार्यलय/ संस्था/ कंपनी मधील कामाचा अनुभव आवश्यक |
| | | विजअ | 1 | ----- | | |
| | | इमाव | 2 | महिला-1 | | |
| | | एकूण | 4 | महिला-1 | | |

वरिल सर्व पदांसाठी किमान व कमाल वय अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिंनाकास परिगणित करण्यात येईल. सर्वसाधारण उमेदवाराचे वय किमान 18 वर्ष व कमाल 38 वर्ष, तसेच मागसवर्गीय उमेदवारांचे किमान वय 18 व कमाल 43 वर्ष यापेक्षा जास्त असु नये.

वरिल तक्त्यामधील क्र.2,3,4, व 5 च्या पदाकरिता 100 गुणांची फक्त लेखी परिक्षा घेवुन गुणवत्तच्या आधारे निवड करण्यात येईल. लेखी परिक्षा मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या घटकांवर/विषयावर आधारित राहील .

प्रभाग समन्वयक पदाकरिता 80 गुणांची लेखी व 20 गुणांची तोंडी परिक्षा घेवुन गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यात येईल, प्रभाग समन्वयक पदाची लेखी परिक्षा मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी, सामाजिक शास्त्रे व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या घटकांवर/विषयावर आधारित राहील .

**उमेदवारांना वेगवेगळया पदांसाठी वेगवेगळा अर्ज सादर करणे बंधन कारक राहील. तथापि एकाच वेळेस वेगवेगळया पदांची परिक्षा आली तर एकाच पदाच्या परिक्षेसाठी उमेदवाराला स्वेच्छेने बसता येईल.**

उपरोक्त सर्व पदासाठी आवश्यक सविस्तर तपशिल **www.beed.nic.in व www.umed.in** या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध आहे. Online अर्ज भरण्यापूर्वी उमेदवारांनी संकेस्थळावरिल सविस्तर तपशिल काळजीपूर्वक वाचावा.

जिल्हा अभियान संचालक
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प.बीड

उमेद
क्षितिज नवे, विश्वास नवा...

# महाराष्ट्र शासन

**ग्रामीण विकास व जलसंधारण विभाग**

## उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बीड कंत्राटी पद भरती -२०१७


**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,**
**हिरो शो रूमच्या वरती, नगर रोड, बीड. ४३११२२**


---

१) एमएसआरएलएम /एचआर/ प्र.क्र.- ४३६/ ९४९ /२०१७ दिनांक १७/०४/२०१७

२) शासन निर्णय क्रमांक :मजीअ २१०७/प्र.क्र.५९/योजना ३ दिनांक ०७ जुलै २०१७

३) मा.मूकाअ MSRLM मुंबई यांचे पत्र क्र.एमएसआरएलएम/ एचआर/प्र.क्र ४३६/२१२९/२०१७ दि.१३.०९.२०१७

४) मा.मूकाअ MSRLM मुंबई यांचे पत्र क्र.एमएसआरएलएम/ एचआर/प्र.क्र ४३८/२१३०/२०१७ दि.१३.०९.२०१७

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बीड मार्फत Intensive तालुक्यात स्वंयसहायता समूहाची स्थापना, सक्षमीकरण, बळकटीकरण, संगोपन , क्षमता बांधणी इत्यादी कामे करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने 11 महिण्याच्या कालावधी करिता जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील प्रभाग समन्वयक व सहायक कर्मचाऱ्याची खालील रिक्त असलेली पदे भरण्याकरिता अर्ज **www.msrlmbeed.govbharti.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत असून ऑनलाईन पध्दतीने दि. 27/ 12/ 2017 ते दि. 10 / 01 /2018 पर्यत अर्ज मागविण्यात येत आहे.

वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची तारीख | 27/12/2017 |
| 2 | ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख | 10/01/2018 |
| 3 | परीक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या चार दिवस अगोदर संकेतस्थळावर सुरु राहील. |
| 4 | लेखी परीक्षा दिनांक | **www.msrlmbeed.govbharti.in** व www.umed.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| 5 | हेल्पलाईन क्र | 02442-226677 |

**1.उपलब्ध पदसंख्या -आरक्षणानुसार भरावयाचा पदांचा तपशिल खालीलप्रमाणे**

| अ.क्र | पदाचे नांव | पद संख्या | जातीचा प्रवर्ग | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अजा | अज | विजअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
| 1 | प्रभाग समन्वयक | 43 | 2 | 4 | 2 | 2 | 2 | 1 | 1 | 7 | 22 | 43 |
| 2 | प्रशासन सहाय्यक | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| 3 | प्रशासन/लेखा सहाय्यक | 10 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 5 | 10 |
| 4 | डाटा एन्ट्री ऑपरेटर | 6 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 | 6 |
| 5 | शिपाई | 4 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 4 |
| | एकूण | 64 | 3 | 7 | 5 | 2 | 2 | 1 | 1 | 13 | 29 | 64 |

**समांतर आरक्षण तपशिल**

| अ.क्र | पदाचे नांव | विवरण | समांतर आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अजा | अज | विजअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
| 1 | प्रभाग समन्वयक | अंपग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 2 |
| | | महिला | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 2 | 8 | 15 |
| 2 | प्रशासन सहाय्यक | अंपग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | प्रशासन/लेखा सहाय्यक | अंपग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 2 |
| 4 | डाटा एन्ट्री ऑपरेटर | अंपग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 2 |
| 5 | शिपाई | अंपग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| | एकूण | | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 6 | 11 | 22 |

**टीप :-**

१) अपंगाची पदे भरतांना सामान्य विभागाचे परिपत्रक दिनांक १९/०३/२०१० मधील सूचनेनुसार अपंगांची पदे सामाजिक प्रवर्गात दर्शविण्यात आलेली आहे मात्र गुणवत्तेनुसार निवड झालेला उमेदवार ते ज्या सामजिक प्रवर्गात असतील त्या सामाजिक प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेण्यात येईल अशा परीस्थितीत जेवढी अपंगाची पदे भरण्यात येईल त्या सामाजिक आरक्षणातील इतर पदामधून कमी करण्यात येईल

२) उपरोक्त अ.क्र. १ ते ५ मध्ये दर्शविलेल्या पदसंखेमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता असून सर्व अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी राखून ठेवले आहेत.

**2.उमेद, MSRLM तालुकास्तरीय पदासाठी शैक्षणिक पात्रता विषयक अटी**

| अ. क्र. | पदाचे नाव दरमहा मानधन | आवश्यक शैक्षणिक आर्हता | एकूण अनुभव (किमान वर्ष) |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समन्वयक (क्लस्टार कॉर्डीनेटर) मासिक CTC रु. २०,५००/- | 1. पदवी परिक्षा उत्तीर्ण<br>2.BSW किंवा Bsc Agriculture किंवा MSW किंवा MBA किंवा PG in Rural Development किंवा PG in Rural Management या पैकी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य राहील.<br>3.संगणक व लॅपटॉप हाताहळणीचे ज्ञान असणे आवश्यक | पदवी परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतरचा जोखीम प्रवण गट ( माहिला, अंपग, SC/ST सह) सामाजिक प्रवर्तन व संस्थीय बांधणी विषयक कामाचा कमीत कमी 3 वर्षाचा ग्रामीण विकास, सामाजिक प्रवर्तन, गरिबी निमुर्लन, उपजिविका विकास कार्यक्रमाचा अनुभव आवश्यक |
| 2 | प्रशासन सहाय्यक मासिक CTC रु.१५०००/- | 1)कोणत्याही शाखेतील पदवी<br>2) इंग्रजी टायपिंग वेग 40 WPM आणि<br>3) मराठी टायपिंग वेग 30 WPM परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>4) MS-CIT किंवा समकक्ष | किमान 3 वर्ष प्रशासकीय कामाचा अनुभव आवश्यक |
| 3 | प्रशासन व लेखा सहाय्यक मासिक CTC रु.१५०००/- | 1)वाणिज्य शाखेतील पदवी<br>2) इंग्रजी टायपिंग वेग 40 WPM आणि<br>3) मराठी टायपिंग वेग 30 WPM परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>4) MS-CIT किंवा समकक्ष | किमान 3 वर्ष प्रशासकीय कामाचा अनुभव आवश्यक |
| 4 | डाटा एन्ट्री ऑपरेटर मासिक CTC रु. १०,०००/- | 1) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण ( इयत्ता 12 वी )<br>2) इंग्रजी टायपिंग वेग 40 WPM आणि<br>3) मराठी टायपिंग वेग 30 WPM परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>4) MS-CIT किंवा समकक्ष | किमान 3 वर्ष डाटा एन्ट्री ऑपरेटर (संगणक परिचालक) कामाचा अनुभव आवश्यक |
| 5 | शिपाई मासिक CTC रु. Rs ८०००/- | 10 वी ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | किमान 3 वर्ष शासकीय कार्यलय/ संस्था/ कंपनी मधील कामाचा अनुभव आवश्यक |

**3.वयोमर्यादा :-**

**वरिल सर्व पदांसाठी किमान व कमाल वय अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिंनाकास परिगणित करण्यात येईल. सर्वसाधारण उमेदवाराचे वय किमान 18 वर्ष व कमाल 38 वर्ष, तसेच मागसवर्गीय उमेदवारांचे किमान वय 18 व कमाल 43 वर्ष यापेक्षा जास्त असु नये.** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम आहे. त्यानुसार खालील समांतर आरक्षणातील व या जाहिरात नमूद प्रवर्गातील उमेदवार अर्ज करू शकतात.

**३.१ अपंग उमेदवारासाठी : - ४५ वर्षापर्यंत**

**4..प्रवेश पत्र-**

जाहिरातील नम्रूद पदाकरिता परीक्षा प्रवेश पत्र **www.msrlmbeed.govbharti.in, व www.umed.in** संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.सदर पत्र पोस्टाने पाठविले जाणार नाही.परिक्षाच्या वेळी उमेदवारांनी प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे.उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वतः चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील.(उदा.आधार कार्ड,PAN कार्ड,निवडणूक ओळखपत्र,वाहन परवाना)

5. **परीक्षेचे स्वरूप व निवड पद्धती :-**

| अ.क्र. | पदाचे नाव | गुण |
|---|---|---|
| १ | प्रभाग समन्वयक | (80 लेखी व मुलाखत २० असे एकूण १०० गुण) |
| २ | १.प्रशासन/लेखा सहाय्यक २.प्रशासन सहाय्यक ३.डाटा एन्ट्री ऑपरेटर ४.शिपाई | १०० लेखी गुण |

- 5.1) लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. निगेटिव्ह मार्किंग पद्धत असणार नाही. वरील पैकी प्रभाग समन्वयक या पदाकरिता दि १३/०९/२०१७ च्या पत्रान्वये लेखी परीक्षेमध्ये मराठी ,इंग्रजी ,सामान्य ज्ञान,बौद्धिक चाचणी ,सामाजिक शास्त्र व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान या घटकावर आधारित ८० गुणांची लेखी परीक्षा व २० गुणांची (मुलाखत) घेऊन गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यात येईल.

प्रशासन/लेखा सहाय्यक , प्रशासन सहाय्यक , डाटा एन्ट्री ऑपरेटर , शिपाई या पदाकरिता दि १३/०९/२०१७ च्या पत्रान्वये लेखी परीक्षेमध्ये मराठी ,इंग्रजी ,सामान्य ज्ञान,बौद्धिक चाचणी व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान या घटकावर आधारित यांप्रमाणे १०० गुणांची लेखी परीक्षा असून गुणानुक्रमे उमेदवाराची निवड करण्यात येईल.

- 5.2) सामान्य प्रसाशन विभाग शासन निर्णय दि १९.१०.२००७ मधील परिच्छेद क्रमांक ६ (२) नुसार ज्या पदाकरिता पदवी हि कमीत कमी अर्हता आहे. अशा पदाकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता१२वी)च्या दर्जाच्या समान राहील
- 5.3)परीक्षेचा निकाल तयार करतांना ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रनीमं /१२१५ /(प्र.क्र.५५/१५)/१३-अ दि ०५/१०/२०१५ मधील निकषावर लावला जाईल.
- 5.4) शासन परिपत्रक क्रमांक -एसआरव्ही-२०१७ /प्र.क्र.३१/९८/*१६-अ दि १६ मार्च १९९९ तसेच शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही -२०१२ /प्र.क्र.१६//१२/१६-अ दि १३ ऑगस्ट २०१४ मधील तरतुदीनुसार समांतर आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी विहित केलेली कार्यपध्दती अनुसरली जाईल.

**6 .सर्व पदाकरिता सर्वसाधारण अटी व शर्ती:-**

- अनुसूचित जाती व जमाती वगळता विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग या मधील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत सक्षम अधिकार्याचे कागदपत्र तपासणीचे दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.
- महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक ८२/२००१/मसेआ००/प्र.क्र.४१५/का-2/दि. २५ मे २००१ मधील तरतुदीनुसार खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना सदर शासन निर्णयात पिरीशिष्ट -3 मध्ये दिलेले खुल्या प्रवर्गात उन्नती व्यक्ती /गट (क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याचे सक्षम अधिकार्याचे कागदपत्र तपासणीचे दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.तसेच पुरेशा प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतरत्र अदलाबदल न करता त्याच प्रवर्गातील पुरुष उमेवारांमधून राखीव असलेली पदे भारण्यात येतील.
- सामान्य प्रशासन अधिसूचना क्रमांक एसआरव्ही -२०००/प्र.क्र.(१७/२०००)१२ दिनांक २८-मार्च २००५ व सामन्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही -२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १जुलै २००५ नुसार लहान कुटुब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे (अविवाहित उमेदवारांनी सुध्दा लागू नाही असे नमूद करून सदर प्रतिज्ञा पत्र सादर करणे आवश्यक आहे)
- सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०११ /प्र.क्र.१०६४ /२०११/ १६-ब दिनांक १२ दिसेबर २०११नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाचे दिनांकापासून ६ महिन्याचे आत सादर करण्याच्या अटीवर व मा सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे अधीन राहून नियुक्ती दिली जाईल सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्रासाठी परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयामार्फत समितीकडे सादर करून जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करणायत येईल नियुक्ती दिल्यानंतर जात पडताळणीसाठीच्या प्रस्ताव हा संबंधीतीकडे सादर केल्याची पोच उमेदवाराने कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.
- अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्राच्या छाननी शिवाय परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेद्वारांने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती किंवा कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे पूर्व चरित्र बरोबर नसल्याचे आढळल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी /नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.किंवा नियुक्ती दिल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यानंतर याबाबत उमेदवाराचा कोणत्याही प्रकारचा उजर एकूण घेतला जाणार नाही.
- या जाहिरातील नमूद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधीन असेल.
- उमेदवार हा महाराष्ट्रातील मूळ रहिवासी असावा. उमेवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याने डोमिसीअल प्रमाणपत्र प्राधिकृत अधिकाऱ्याकडून घेतलेले असावे डोमिसीअल प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील जन्माचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. उपरोक्त बाबत शासनाने वेळोवेळी विहित केकेल्या सक्षम अधिकार्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.
- शासकिय/निमशासकीय कर्मचार्यांनी त्यांच्या नियुक्ती प्रधीकार्याची परवानगी घेऊन अर्ज करावा निवड झालेल्या उमेदवारांना सदर पत्राची प्रत प्रमाणपत्र तपासणीवेळी सादर करावी लागेल.

- वेगवेगळ्या पदासाठी वेगवेगळा अर्ज सादर करावा लागेल. परंतु एकाच वेळेस वेगवेगळ्या पदाची परीक्षा आली तर एकाच पदाच्या परीक्षेसाठी उमेदवाराला स्वेच्छेने बसता येईल.
- अनुभव प्रमाणपत्र मोघम नको. अनुभव प्रमाणपत्रावर संस्थेचा /कार्यालयाचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांक असणे आवश्यक आहे.तरच संबंधित पदाचा अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. तसेच मानधन/ वेतन मिळाल्याचा तपशील मागणी केला जाऊ शकतो याची नोंद घ्यावी.
- नॉनक्रीमिलीयार प्रमाणपत्र निजीकाच्या काळात काढलेले असावे. (विमुक्त जाती ब भटक्या जमाती /विशेष मागास प्रवर्ग/ इतर मागास प्रवर्ग करिता आवश्यक) सदर प्रमाणपत्र दिनांक ३१ मार्च २०१८ च्या आर्थिक वर्षा पर्यंत वैद्य असणे आवश्यक आहे. वैद्य प्रमाणपत्र नसलेल्या उमेवारांच्या विचार केला जाणार नाही व अशा उमेवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही. जर उमेवारांचे खुल्या प्रवर्गाचे परीक्षा शुल्क भरले असेल तर त्यांचा अर्ज प्रवर्गासाठी ग्राह्य धरण्यात येईल.
- जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शक केंद्रात नाव नोंदणी केली असली तरीदेखील वरील पदासाठी रीतसर Online अर्ज अधिकृत संकेतस्थळावर भरणे आवश्यक आहे.
- नैसर्गिक आपतीमुळे विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड हे ठरवतील त्या प्रमाणे सोयीच्या दिवशी लेखी व मुलाखती घेण्यात येतील याबाबत www.msrlmbeed.govbharti.in व www.umed.in या संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात येईल.
- सदर जाहिरातीमधील रिक्त पदाच्या संख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.परीक्षेचा प्रकार पदांची संख्या समांतर आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे/अंशतः बदल करणे ई. सर्व अधिकार हे अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड स्वतः कडे राखून ठेवत आहेत. कोणालाही याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयातदाद मागता येणार नाही.
- उमेदवारांनी त्यांचे निवडीबाबत किंवा निवडी नंतर पद्स्थापानेबाबत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणल्यास तसेच पदस्थापनेत बदल करण्याबाबत विनंती केल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
- शासनाने विहित केलेली शारीरिक पात्रता प्रमाणपत्र व चांगली वर्तणूक असल्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.
- परीक्षेस पात्र /अपात्र उमेवारांची यादी, लेखी परीक्षेचा निकाल, प्रारूप निवड यादी, अंतिम निवड यादी व भरती प्रकीयेसंबंधित देण्यात येणाऱ्या सुधारित व अद्यावत सूचना कार्यालयाचे नोटीस बोर्डवर तसेच www.msrlmbeed.govbharti.in व www.umed.in संकेतस्थळा वर प्रसिध्द करणायत येईल याबाबत स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.
- उमेद्वाराना लेखी परीक्षेस कागदपत्र तपासणीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल.
- प्रस्तुत भरती प्रक्रियेच्या वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.तसेच सदरील प्रक्रियेत काही बाबी नमूद करावयाच्या राहिल्यास किंवा अनावधानाने चुकीच्या नमूद केलेल्या असल्यस त्या प्रचलित शासन निर्देशानुसार/निर्णयानुसार लागू राहील.जाहिराती बाबत काही शंका असल्यास त्यांनी जिल्हा अभियान व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान,बीड यांना कार्यालयीन वेळेत समक्ष भेटावे.
- परीक्षे नंतर संवर्गनिहाय उत्तरतालिका जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,बीड च्या माहिती फलकावर व www.msrlmbeed.govbharti.in व www.umed.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
- उत्तर तालिका प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर आक्षेप असल्यास २ दिवसाच्या आत लेखी आक्षेप पुराव्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा अभियान संचालक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान,बीड यांच्या कार्यालयात किंवा या कार्यालयाचे ई मेल आयडी dmmubeed@gmail.com यावर सादर करावेत उशिरा प्राप्त होणार्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.
- जाहिरातीत नमूद अटीत बदल करणे , जाहिरातीच्या काही भागात अंशतः बदल करणे वा संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकरी जिल्हा परिषद बीड यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

जिल्हा अभियान व्यवस्थापक
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
बीड

सह जिल्हा अभियान संचालक
**प्रकल्प संचालक**
बीड

अध्यक्ष
जिल्हा अभियान संचालक
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद बीड**